	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.	स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक क्र.मुविमं/लेखा २/प्रात्य.फेब्रु.26/4200 दि. २९/१२/२०२५

विषय:— कनिष्ठ महाविद्यालयाचा बॅंक तपशील सादर करणे बाबत.

मुंबई विभागीय मंडळाच्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की,आगामी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी—मार्च २०२६ (इ.१२वी) प्रात्यक्षिक परीक्षेकरिता प्रचलित कार्यपध्दतीनुसार मंडळामार्फत कनिष्ठ महाविद्यालयाचे बॅंक खात्यावर अग्रिम रक्कम जमा केली जाते तथापि, काही कनिष्ठ महाविद्यालये बॅंक खाते क्रमांक न देता प्राचार्य/मुख्याध्यापक यांचा वैयक्तिक खाते क्रमांक देतात.सदर प्रकरणी कनिष्ठ महाविद्यालयीन कामकाजा संदर्भातील आर्थिक व्यवहारकामी उपयोगात आणले जाणारे खाते क्रमांकच त्यांच्या IFSC CODE सह अचुकरित्या मंडळास देणे अभिप्रेत आहे. म्हणजे सदर रक्कम विनाविलंब जमा करता येईल कारण, संबंधित व्यक्तीची बदली किंवा सेवा निवृत्ती झाल्यास देण्यात आलेल्या अग्रिम रक्कमेचे समायोजन करणे जिकिरीचे होत असते.तसेच, काही कनिष्ठ महाविद्यालये संस्थेचा बॅंक खाते क्रमांक देत असतात त्यामुळे खाते क्रमांक वेगळ्या नावाने असतो मंडळाकडून कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावे अग्रिम अदा केली जात असल्याने नाव व खाते क्रमांक भिन्न असला तरी अग्रिम रक्कम संबंधिताच्या खाती वर्ग न होता पुन:श्च मंडळास प्राप्त होत असते व कार्यवाहीस विलंब होतो.

तरी, या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की,सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत कनिष्ठ महाविद्यालयाचाच खाते क्रमांक रद्द धनादेश व पत्रासह (प्राचार्य/मुख्याध्यापक किंवा संस्था यांचा वैयक्तिक खाते क्रमांक न देता) समक्ष मंडळास विनाविलंब सादर करण्याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे—पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987
*Email * : sschscmumbaiboard@gmail.com * Website *: www.sschscmumbaiboard@gmail.in